# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०५/२०१९
## दि.२४/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३७९/१९,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ६० वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | जानेवारी २०१९ ते दि.०९/०५/२०१९ रोजी नॅन्सी लेक होम्स भारती विद्यापीठ समोर कात्रज पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी, कोणीतरी अज्ञात इसमाने, यातील फिर्यादी यांचे घरात प्रवेश करुन, फिर्यादी यांनी कपाटातील ठेवलेले ७ लाख ०४ हजार रु.किं. सोन्याचे दागिने लबाडीचे इराद्याने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पो. निरी. व्हि.ए.भोसले ९५९४९१४२४२४ |

## दि.२५/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २०६/१९,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲ.क. ३,७ |
| **फिर्यादी** | परशुराम धनगर,वय २८ वर्षे,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | १)लॉरेन्स उर्फ लागर राजु पिल्ले, वय ३२ वर्षे,रा.भीमटोला मंडळाजवळ, १३ ताडीवाला रोड, पुणे, २)रोहण मल्लेश तुपधर,वय ३२ वर्षे,रा.थोपटे चाळ, मारुती मंदिराजवळ १३ ताडीवाला रोड, पुणे ३)शंशाक उर्फ ऋषभ संतोष बेंगळे, वय २० वर्षे,रा. पप्पु गायकवाड यांचे ऑफिस मागे, भाजी मार्केट पुणे, व इतर ७ इसम (अ.क्र.१ ते ३ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०१९ रोजी रात्रौ ११/०० वा.चे सुमारास मारुती मंदिर ताडीवाला रोड,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी जवेण करुन मारुती मंदिर परिसरात पायी फिरत असताना, मारुती मंदिर ताडीवाला रोड, येथील समोरील गल्लीमध्ये काही मुले आरडाओरडा करत हातातील काचेच्या बाटल्या, दगड फेकुन रिक्षांच्या काचा फोडत, घरावर दगडफेक करत लोकांच्या मनात दहशत, भिती निर्माण करत होती. त्यावेळी लोक त्यांच्या घरांच्या खिडक्या दरवाजे बंद करत होते. त्यावेळी फिर्यादी देखील घाबरुन घरी जात असताना, यातील अ.क्र.१ लॉरेन्स पिल्ले याने फिर्यादी यांना ओळखले व त्याने त्याचे इतर साथीदारांना बोलावुन,याला धरा व जीवे ठार मारा असे म्हणुन त्याने त्याचे हातातील पालघन सारख्या शस्त्राने फिर्यादी यांचे डोक्यात, पाठीमागील बाजुस वार करुन, इतरांनी दगडाने मारहाण करुन,गंभीर जखमी करुन, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करुन, तसेच सदर परिसरातील घरांवर दगडफेक करुन, रस्त्यावर बिअरच्या बाटल्या फोडत रिक्षाच्या काचा फोडुन दहशत निर्माण केली आहे. (यातील फिर्यादी ससुन हॉस्पिटल येथे औषधोपचार घेत आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. देशमुख ९४२१०८५८८८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**